ePaper

वर्ष - 6 ।अंक - 193 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | ।मंगळवार।दिनांक 24ऑक्टोबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# मुंबई महापालिका निवडणुकीत काँग्रेस स्वबळावर?: मल्लिकार्जुन खरगे



## आतील पानांत


- लक्ष्मीपूजनाच्या दिवशी शहरात सहा ठिकाणी आग !
- सुसंस्कृत राजकारणाचा आदर्श!
- दिवाळी ती दिवाळीच!


# नेत्यांच्या नावाने खड्ड्यांचे बारसे!

## खड्ड्यांना मंत्री गडकरी आणि खासदार बारणेंचं नाव देत केली निषेधाची दिवाळी

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**यमलोक महामार्ग ठरलेल्या चाकण-तळेगाव या २२ किलोमीटरच्या राष्ट्रीय महामार्गावर एक हजार खड्डे पडले आहेत. त्याबाबत मोठा पाठपुरावा करूनही ते बुजविण्यात न आल्याने चाकण-तळेगाव महामार्ग कृती समितीने त्यावर निषेधाची खड्डे रांगोळी साजरी केली. समितीने या महामार्गावरील ब्लॅक स्पॉट असलेल्या इंदूरी येथील पन्नास खड्डे बुजवून त्यातील दोन खड्ड्यांना केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी व स्थानिक खासदार (मावळ) श्रीरंग बारणे यांची नावे दिली. त्यामुळे या आंदोलनाची सर्वत्र चर्चा झाली.**



तळेगाव-चाकण महामार्गावरील जीवघेणे खड्डे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून दुरुस्त होत नसल्यामुळे तळेगाव-चाकण महामार्ग-/241 कृती समितीने आज अचानक हे गांधीगिरी आंदोलन केले. खड्डे बुजवत,त्यावर दिव्यांची रांगोळी काढून या खड्डयांना गडकरी आणि खा. बारणेंची नावे देत त्यांनी तीव्र निषेध नोंदवला. पथदिवे नसलेल्या महामार्गावरीलअपघातग्रस्त इंदूरी या ठिकाणचे मोठे खड्डे समितीने माती टाकून बुजविले. नंतर त्यावर दिव्यांची रांगोळी काढली.तेथे घोषवाक्य लिहून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि बेजबाबदार लोकप्रतिनिधींचा निषेध केला. समिती अध्यक्ष नितीन गाडे,उपाध्यक्ष दिलीप डोळस,सचिव अमित प्रभावळकर, प्रमोद दाभाडे,संजय चव्हाण,चेतन डोळस तसेच जागरुक वाचक कट्टा समूहाच्या सदस्या विद्या काशीद,भास्कर माळी आदींनी या आंदोलनात भाग घेतला. यानंतर हे खड्डे बुजवले जातील,असा आशावाद समितीच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. मात्र,जर तसे झाले नाही,तर येत्या १ तारखेला समिती सदस्य मुंडन आंदोलन करतील,असा इशारा समिती उपाध्यक्ष दिलीप डोळस यांनी दिला आहे. दरम्यान, हे खड्डे भरताना देखील वडगाव आणि चाकण अशा महामार्गाच्या दोन्ही बाजूंनी अवजड वाहने सोडण्याच्या वाहतूक पोलीसांच्या बेफिकीरीचाही समितीच्या सदस्यांनी निषेध केला.

### खड्ड्यांत बेशरम वनस्पती लावून आंदोलन

अवजड वाहनांची २४ तास मोठी वर्दळ असलेला दोन एमआयडीसी जोडणारा तळेगाव-चाकण महामार्ग अतिशय अरुंद आहे.त्यातही तळेगाव-चाकण या अपघातग्रस्त टापूत पाच वर्षात २५२ बळी गेल्याने कृती समिती स्थापन करण्यात आली आहे. यासंदर्भात समिती उपाध्यक्ष डोळस म्हणाले, सकाळी सात ते संध्याकाळी सात या वेळेत या महामार्गावर अवजड वाहनांना बंदी आहे. तरीही पोलिस प्रतीट्रक दोनशे-तीनशे रुपये घेऊन त्या वेळेत ते ती सोडत आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडी होऊन अपघात होतात. त्यात खड्यांनी आणखी भर पडली आहे. म्हणून त्याच्या निषेधार्थ या पावसाळ्यात समितीने खड्डुयांत बेशरम वनस्पती लावून आंदोलन केले. रास्ता रोकोही केला.

### 104 किलोमीटर अंतरात अपघात पाचवीलाच पुजलेले...

महामार्ग दुरुस्तीबाबत खेडचे आमदार दिलीप मोहिते-पाटील, शिरूरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे आणि मावळचे खा.बारणे यांना अनेकदा मेल केले. पाठपुरावा केला.पण,त्यांच्याकडून प्रतिसाद आला नाही.फक्त स्थानिक आमदार मावळचे सुनील शेळके यांनी प्रतिसाद देत सहा कोटी रुपयांचा निधी आणला. त्यातून मावळच्या हद्दीतील महामार्गाचीच दुरुस्ती झाली.

# दिशा फाऊंडेशन आयोजित दिवाळी फराळ कार्यक्रम उत्साहात

## सर्वपक्षीय नेत्यांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची हजेरी

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वपक्षीय दिग्गज नेत्यांनी नेहमीचे हेवेदावे बाजूला ठेवून रविवारी एकत्रितपणे दिवाळी फराळाचा आनंद घेतला. खेळीमेळीच्या वातावरणात रंगलेल्या या गप्पांच्या मैफलीत विविध क्षेत्रातील मान्यवरही सहभागी झाले होते. दिशा सोशल फाऊंडेशनच्या वतीने काळेवाडी येथील 'रागा पॅलेस' या ठिकाणी दिवाळी फराळ या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार अमर साबळे, माजी मंत्री बाळा भेगडे, आमदार अण्णा बनसोडे, पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, प्रसिध्द निवेदक सुधीर गाडगीळ, वनराईचे अध्यक्ष रवींद्र धारिया, मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराजराजे भोसले, अर्जून पुरस्कार विजेते खेळाडू शांताराम जाधव, नाटय़ परिषदेचे शहराध्यक्ष भाऊसाहेब भोईर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचीव सचिन साठे, काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास कदम, शिवसेनेचे शहराध्यक्ष सचिन भोसले, मनसेचे शहराध्यक्ष सचिन चिखले, भाजप नेते शंकर जगताप, कार्तिक लांडगे, माजी महापौर संजोग वाघेरे, राहूल जाधव, नितीन काळजे, पिंपरी प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, संत तुकाराम कारखान्याचे संचालक बाळासाहेब विनोदे, चेतन भुजबळ, माजी उपमहापौर राजू मिसाळ, माजी नगरसेवक नाना काटे, शत्रुघ्न काटे, संतोष कांबळे, अमित गावडे, विक्रांत लांडे, अभिषेक बारणे, सुरेश भोईर, धनंजय काळभोर, बाळासाहेब मोरे, संदीप चिंचवडे, प्रेरणा बँकेचे अध्यक्ष कांतीलाल गुजर, इंद्रायणी बँकेचे अध्यक्ष अॅड. एस. बी. चांडक, सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी अशोक मुंढे, सहायक आयुक्त अण्णा बोदडे, नाट्यव्यवस्थापक समीर हंपी, शिक्षणाधिकारी भाऊसाहेब कारेकर, डॉ. पंडित शेळके, प्राचार्य नितीन घोरपडे, निवेदक वि. दा. पिंगळे, श्रीकांत चौगुले, डॉ. विनायक पाटील, डॉ. रोहन काटे, डॉ. श्रीकृष्ण जोशी आदींनी हजेरी लावली. दोन तास रंगलेल्या या मैफिलीत उपस्थित मान्यवरांमध्ये विविध विषयांवर चर्चा झाली. प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष नाना शिवले यांनी केले. सूत्रसंचालन संतोष निंबाळकर यांनी केले. नंदकुमार कांबळे यांनी आभार मानले. गोरख भालेकर, सचिन साठे, संतोष बाबर आदींनी संयोजनात पुढाकार घेतला.

क्लिक



# घरोघरी लक्ष्मीपूजन उत्साहात!

**पिंपरी-चिंचवड ।** दारांवर प्रकाशमान आकाशकंदील... दारांसमोर सप्तरंगी रांगोळी...घरातील सोनेनाणे-पैशांची साग्रसंगीत व विधिवत पूजा आणि आकाशात फटाक्यांची आतषबाजी अशा उत्साही वातावरणात सोमवारी सायंकाळी पिंपरी-चिंचवडसह पुण्यात घरोघरी तसेच व्यावसायिक आस्थापनांसह सुवर्णदालनांतून दिवाळीचे लक्ष्मीपूजन उत्साहात पार पडले. दोन वर्षांच्या कोरोनाच्या महामारीतून जनजीवन पूर्वपदावर येत असल्यामुळे नागरिकांमध्ये दीपावलीचा उत्साह आणि जल्लोष पहायला मिळाला. शुभमुहूर्तावर घराघरांतून लक्ष्मीची मातीची मूर्ती आणली गेली होती. याशिवाय स्वच्छता लक्ष्मी असलेले झाडूही आणले होते. यांच्यासह लक्ष्मी प्रतिमा, दागिने, पैसे यांची घरोघरी पूजा करण्यात आली तर व्यापारी पेढ्यांमध्ये खतावणीसह संपत्तीची पूजा करण्यात आली.

# लक्ष्मीपूजनाच्या दिवशी शहरात सहा ठिकाणी आग !

## घोरपडीतील सोसायटीमध्ये आठ दुचाकी पेटल्या

।पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी शहरात मोठ्या प्रमाणावर आतषबाजी करण्यात आली. शहरातील सहा ठिकाणी फटाक्यांमुळे आगी लागल्याच्या घटना घडल्या. घोरपडीतील बी. टी. कवडे रस्त्यावरील एका सोसायटीतील आठ दुचाकींनी पेट घेतल्या. रात्री उशीरापर्यंत शहरातील वेगवेगळ्या भागात फटाक्यांमुळे आग लागण्याच्या किरकोळ घटना घडल्याने अग्निशमन दलाच्या जवानांची धावपळ उडाली. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सायंकाळी सातनंतर शहरात मोठ्या प्रमाणावर आतषबाजी सुरू झाली. आतषबाजीमुळे आसमंत उजळून निघाला होता. पर्वती पायथा परिसरातील जनता वसाहतीत गल्ली क्रमांक ४७ येथे एका झाडाला फटाक्यांमुळे आग लागली. कात्रजमधील आंबेगाव पठार येथील साईसिद्धी चौकात आग लागल्याची घटना घडली. सोसायटीतील सदनिकेच्या गॅलरीत ठेवलेल्या साहित्यावर फटाक्यांची ठिणगी पडल्याने आग लागली.

रात्री साडेआठच्या सुमारास घोरपडीतील बी. टी. कवडे रस्त्यावर बिटाटेल एनक्लेव्ह सोसायटीत फटाक्यांमुळे आग लागली. फटाक्यांमुळे पार्किंगमधील आठ दुचाकी पेटल्या. या घटनेची



माहिती मिळाल्यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी घेऊन आग आटोक्यात आणली. सिंहगड रस्त्यावरील नऱ्हे भागात मानाजीनगर येथे ज्ञानदीप शाळेच्या छतावर पडलेल्या पालापाचोळ्याने पेट घेतला. विश्रांतवाडीतील सिरीन हॉस्पिटलसमोर पेटता फटाक्यामुळे झाडाला आग लागली. वारजे माळवाडीत चैतन्य चौकातील युनिव्हर्सल सोसायटीत एका बंद सदनिकेत आग लागली.

### अग्निशमन दलाच्या जवानांची धावपळ

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सायंकाळी शहरात फटाक्यांमुळे एकापाठोपाठ आग लागण्याच्या घटना घडल्या. सायंकाळी सात ते रात्री नऊ दरम्यान सहा ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडल्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली.

**अनर्थ टळला**

अग्निशमन दलाचे सहायक विभागीय अधिकारी रमेश गांगड, वाहनचालक शाहनवाज सय्यद सोमवारी दुपारी वाहनातून धानोरी परिसरातून जात होते. त्या वेळी एका रिक्षाच्या सीएनजी टाकीतून गळती होत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. सय्यद यांनी प्रसंगावधान राखून रिक्षात ठेवलेली फटाक्यांची पिशवी बाहेर काढली. रिक्षातून सीएनजी गळती झाल्यानंतर रिक्षाचालक आणि प्रवासी बाहेर उतरले होते. या घटनेमुळे धानोरी रस्त्यावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. गांगड आणि सय्यद यांनी रस्त्यातील रिक्षा रस्त्याच्या कडेला नेली. रिक्षात आग लागली नसल्याची खात्री केली.

# यंदाचे वर्ष पृथ्वीवरील सर्वांत उष्ण वर्षांपैकी एक ठरण्याची शक्यता आंदोलन

## नॅशनल ओशनिक अँड ॲटमोस्फेरिक ॲमिनिस्ट्रेशनचा अहवाल

।पुणे। महाईन्यूज ।

जागतिक पातळीवर यंदाचा सप्टेंबर हा १४३ वर्षांतील सर्वांत उष्ण होता. सप्टेंबरमधील तापमान जागतिक सरासरीच्या ०.८८ डिग्रीने अधिक होते. तसेच यंदाचे वर्ष पृथ्वीवर नोंदवलेल्या गेलेल्या दहा सर्वांत उष्ण वर्षांपैकी एक ठरण्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे.

अमेरिकास्थित नॅशनल ओशनिक अँड ॲटमोस्फेरिक ॲमिनिस्ट्रेशनच्या (एनओएए)



अहवालातून ही माहिती समोर आली. सरासरी तापमानापेक्षा आफ्रिका, उत्तर अमेरिका, दक्षिण आशिया, ॲटलांटिक आणि उत्तर दक्षिण अमेरिका या प्रदेशात नोंदवले गेले. तर युरोप, उत्तर आशिया, भारताचा काही भाग, दक्षिण पूर्व पॅसिफिक महासागर या भागात सरासरीइतके किंवा सरासरीपेक्षा कमी तापमान नोंदवले गेले. दक्षिण आशिया, ऑस्ट्रेलिया, मध्य युरोप, कॅरेबियन बेटे आणि दक्षिण-पूर्व आशियात झालेल्या सरासरीपेक्षा अधिक पावसामुळे तापमान सरासरीइतके किंवा सरासरीपेक्षा कमी झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. गेल्या महिन्यात समुद्रातील बर्फ मोठ्या प्रमाणात कमी झाले. आर्टिक्ट सागरामध्ये ९.८८ दशलक्ष चौरस मैल आहे. हे प्रमाण १९८१ ते २०१० या कालावधीतील बर्फापेक्षा कमी आहे. तर अंटार्क्टिकामध्ये सरासरीपेक्षा १.९० दशलक्ष चौरस मैल कमी बर्फ असल्याचे अहवालात मांडण्यात आले आहे.

अहवालानुसार २०२२ हे वर्ष आजपर्यंतच्या सर्वाधिक दहा उष्ण वर्षांपैकी एक ठरण्याची शक्यता ९९ टक्के आहे. तर पहिल्या पाच सर्वांत उष्ण वर्षांपैकी एक ठरण्याची शक्यता पाच टक्क्यांपेक्षा कमी असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

# माहिती भरण्यासाठी १० नोव्हेंबरची मुदत

## माहितीनुसार समग्र शिक्षाच्या निधीचे नियोजन

।पुणे। महाईन्यूज ।

केंद्र सरकारकडून राज्यातील सर्व मान्यता प्राप्त शाळांची माहिती यु-डायस प्लस प्रणालीमार्फत संगणकीकृत करण्यासाठी १० नोव्हेंबरची मुदत देण्यात आली आहे. यु-डायस प्लस प्रणालीद्वारे मिळणाऱ्या माहितीच्या आधारेच केंद्र शासनाकडून समग्र शिक्षा योजनेचे वार्षिक नियोजन, राज्यनिहाय शैक्षणिक निर्देशांकांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

यु-डायस प्लस प्रणालीमध्ये केंद्र शासनाकडून दोन टप्प्यामध्ये माहिती गोळा करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात शाळेची सांख्यिकी माहिती, शाळा सुरक्षा, अनुदान आणि खर्च, व्यावसायिक प्रशिक्षण, भौतिक सुविधा, संगणक आणि नाविन्यपूर्ण डिजिटल उपक्रम, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी वर्ग आदी माहिती संगणकीकृत करण्यात येणार आहे. तर दुसऱ्या टप्प्यात शाळांतील विद्यार्थ्यांची तपशीलवार माहिती, शासनाकडून दिल्या जाणाऱ्या सुविधा, व्यावसायिक शिक्षण संबंधित माहिती, शाळाबाह्य विद्यार्थ्यांची माहिती, आधार संबंधित माहिती, आरटीई प्रवेश, सहाय्यभूत सुविधा आदी माहिती यु-डायस प्लस प्रणालीद्वारे शाळास्तरावर अद्ययावत करण्यात येणार आहे. यु-डायस प्लस प्रणाली १७ ऑक्टोबर कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्हा स्तरावर यु-डायस प्लस प्रणालीचे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी कार्यशाळा आयोजित करून जिल्ह्यातील यु-डायस संबंधित काम करणारे संबंधित गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, कार्यक्रम अधिकारी, बांधकाम विभागाचे अधिकारी, दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता काम करणारे अधिकारी, मोबाईल शिक्षक आदी अधिकाऱ्यांना, शाळा मुख्याध्यापकांना प्रशिक्षण द्यावे. प्रशिक्षणात माहिती संकलनाबाबत मार्गदर्शन करावे. संबंधित माहिती केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांच्या अंमलबजावणासाठी आवश्यक असल्याने अचूक असणे आवश्यक आहे, अशा सूचना महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प



# कात्रज भागात दहा लाखांचे अमली पदार्थ जप्त; एकजण अटकेत

। पिंपरी । । महाईन्यूज ।

कात्रज भागात अमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्या एकाला गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने पकडले. त्याच्याकडून दहा लाख रुपयांचे एक किलो २१ ग्रॅम चरस, मोबाइल संच असा साडेदहा लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी सर्फराज मुजफ्फर खान (वय ३५, रा. साईसदन अपार्टमेंट, मांगडेवाडी, कात्रज, मूळ रा. मोहिते कॉलनी, कदमवाडी, कोल्हापूर) याला अटक करण्यात आली. खान याच्या विरोधात भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात



अमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमली पदार्थ विरोधी पथक कात्रज भागात गस्त घालत होते. मांगडेवाडी परिसरात एक जण चरस विक्रीसाठी आल्याची माहिती तपास पथकाला मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावून खानला पकडले. खान याच्याकडील पिशवीची झडती घेण्यात आली. तेव्हा पिशवीत चरस सापडले.

खान याच्याकडून चरस जप्त करण्यात आले. खान याच्या विरोधात अमली पदार्थ विक्रीचे आणखी काही गुन्हे आहेत का? या दृष्टीने पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे. अतिरिक्त पोलीस आयुक्त रामनाथ पोकळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील थोपटे, उपनिरीक्षक एस. डी. नरके, संतोष देशपांडे, प्रशांत बोमादंडी, नितीन जगदाळे, युवराज कांबळे आदींनी ही कारवाई केली.

# सुसंस्कृत राजकारणाचा आदर्श!

## भाजपाचे एकनाथ पवार यांचा निर्णय : यंदा वाढदिवस साजरा करणार नाही

पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड राजकीय परिघाला सुसंस्कृत आणि आपुलकीचा- जिव्हाळ्याचा नात्या-गोत्याचा सुगंध आहे. भले राजकीय उलथापालथ काहीही होवो. संपूर्ण राज्यात राजकारणाची पातळी आणि दर्जाही घसरलेले असताना पिंपरी-चिंचवडमध्ये अद्यापतरी सुसंस्कृतपणा आणि राजकारणापलिकडील माणुसकी कायम आहे. त्याचा प्रत्यय माजी सत्तारुढ पक्षनेते आणि भाजपाचे प्रदेश प्रवक्ते एकनाथ पवार यांच्या कृतीतून पुन्हा एकदा अनुभवायला मिळाला.**



भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या मातोश्री कै. सौ. हिराबाई किसनराव लांडगे यांचे दि. २४ सप्टेंबर रोजी निधन झाले. या दु:खात सहभागी होत माजी सत्तारुढ पक्षनेते एकनाथ पवार यांनी यावर्षी (२५ ऑक्टोंबर) त्यांचा वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला आहे. राजकीय, सामाजिक क्षेत्रातील सहकारी, भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते तसंच हितचिंतकांनी माझा वाढदिवस साजरा करु नये, वाढदिवसानिमित्त होणारा खर्च टाळून नुकसानग्रस्त शेतकरी, विद्यार्थ्यांना मदत करावी, असेही आवाहन एकनाथदादा पवार यांनी कार्यकर्त्यांना केले आहे. वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी, हितचिंतकांनी कोणत्याही सोहळे-समारंभांचे आयोजन करु नये, पुष्पगुच्छ पाठवू नयेत, होर्डिंग्ज् लावू नयेत, वृत्तपत्रे, टिव्ही, समाजमाध्यमांवर जाहिराती प्रसारित करु नयेत, यावर होणारा खर्च वाचवून त्या निधीतून पूरग्रस्त शेतकऱ्यांना, विद्यार्थ्यांना मदत करावी. लोकोपयोगी उपक्रमांचं आयोजन करुन नागरिकांना दिलासा देण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन एकनाथ पवार यांनी केले आहे.

### एकनाथ पवार यांचा समंजसपणा...

**२०१४ मध्ये प्रचंड मोदी लाट असताना भोसरी विधानसभा मतदार संघातून एकनाथ पवार यांनी अधिकृत 'कमळ' चिन्हावर निवडणूक लढवली होती. त्यावेळी महेश लांडगे यांनी 'अपक्ष' निवडणूक लढवली होती. त्यानंतरच्या काळात लांडगे यांनी भाजपाशी सलोखा वाढला. भविष्यातील प्रतिस्पर्धी असतानाही भाजपाच्या निष्ठावंत गटाचा प्रभावी चेहरा असेलल्या एकनाथ पवार यांनी पक्षहितासाठी समंजसपणा दाखवला. २०१७ च्या निवडणुकीत त्यांना भाजपाच्या तिकीटावर महापालिका निवडणूक जिंकली. भाजपाच्या सत्ताकाळात पहिले सत्तारुढ पक्षनेते झाले. त्यानंतर २०१९ मध्ये आमदार लांडगे यांनी भाजपाच्या तिकीटावर विधानसभा लढवली. त्यावेळी एकनाथ पवार यांनी पक्षाचे काम निष्ठेने केले. आपसातील स्पर्धा बाजुला ठेवून आपण विधानसेचे दावेदार नाही, असे स्पष्ट केले. पक्षादेश आणि पक्षहित यासाठी एकनाथ पवार यांनी समंजसपणा कायम दाखवला. प्रदेश प्रवक्ता पदावर संधी मिळाल्यानंतर आता एकनाथ पवार पक्षाची पर्यायाने विद्यमान अध्यक्ष असलेले महेश लांडगे यांची बाजु अत्यंत सक्षमपणे मांडताना दिसतात. ही बाब राजकीय समंजसपणा आणि खिलाडूवृत्तीचा आदर्श आहे, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.**

# 'स्वच्छता का उपहार' कार्यक्रमांतर्गत 'खेळ रंगला पैठणी'चा

## पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाचा पुढाकार: सर्वसामान्य नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने आठही क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात दीपावलीचे औचित्य साधून स्वच्छता का उपहार या कार्यक्रमाअंतर्गत खेळ पैठणीचा या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, जास्तीत जास्त महिला आणि महिला बचत गटांनी या कार्यक्रमामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.**



स्वच्छ महाराष्ट्र अथवा स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शासनाच्या निर्देशानुसार घनकच-याच्या स्त्रोतावर विलगीकरण या मोहिमेअंतर्गत स्वच्छता का उपहार ही मोहीम राबविण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने जनजागृती करण्यासाठी महापालिकेच्या वतीने आठही क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात खेळ पैठणीचा हा कार्यक्रम आयोजित करून अनोख्या पद्धतीने जनजागृती करण्यात येत आहे.

आज ड क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत डायनासॉर उद्यान, पिंपळे गुरव या ठिकाणी खेळ पैठणीचा हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी सहायक आरोग्य अधिकारी महेश आढाव, मुख्य आरोग्य निरीक्षक अतुल सोनवणे, आरोग्य निरीक्षक भीमराव कांबळे यांच्यासह मोठ्यासंख्येने महिला आणि महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते. अनेक तास रंगलेल्या या खेळात सह शिक्षिका अनुजा कांबळे या विजेत्या ठरल्या असून मानाच्या पैठणीच्या त्या मानकरी ठरल्या आहेत.

दि. २२ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी १० वाजता 'अ' क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत आकुर्डी येथील पंचतारा नगर मध्ये आकुर्डी हॉस्पिटल जवळ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दुपारी ३ वाजता 'फ' क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत निगडी येथील भक्ती शक्ती उद्यान या ठिकाणी हा कार्यक्रम पार पडला. तर 'ग' क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात थेरगाव येथील बापुजीबुवा उद्यान येथे सायंकाळी ५ वाजता खेळ पैठणीचा हा कार्यक्रम संपन्न झाला.

दि. २३ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी १० वाजता 'ब' क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात चिंचवड येथील राजमाता जिजाऊ उद्यानात या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. तसेच 'क' क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत भोसरी येथील इंद्रायणीनगर मध्ये इंद्रायणीनगर बॅडमिंटन हॉल या ठिकाणी दुपारी १२ वाजता हा खेळ रंगला.

तर 'इ' क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात मोशी येथील नागेश्वर मंदिरासमोर दुपारी २ वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच 'ह' क्षेत्रीय कार्यालयाच्या परिसरात दापोडी येथील दापोडी विहार या ठिकाणी सायंकाळी ५ वाजता हा खेळ पैठणीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये स्वच्छता, कचरा विलगीकरण, प्लास्टिक बंदी आणि प्रदूषण आदींबाबत जनजागृती करण्यात आली.

**स्वच्छ महाराष्ट्र अथवा स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शासनाच्या निर्देशानुसार घनकच-याच्या स्त्रोतावर विलगीकरण या मोहिमेअंतर्गत स्वच्छता का उपहार ही मोहीम राबविण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने जनजागृती करण्यासाठी महापालिकेच्या वतीने आठही क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात खेळ पैठणीचा हा कार्यक्रम आयोजित करून अनोख्या पद्धतीने जनजागृती करण्यात येत आहे.**

## संपादकीय

# दिवाळी ती दिवाळीच!

***पाऊस आहे, महागाईच्या बातम्या आहेत आणि आकडेही आहेत.. ऑनलाइन खरेदी कधीही होऊ शकते, तरीही दिवाळीचे अप्रूप मात्र टिकून आहे..***

जगण्यावरचा विश्वासच उडून जात असताना.. नातेवाईक, शेजारी यांचा अकस्मात मृत्यू पाहताना.. मनाची उभारी कशीबशी टिकवून ठेवताना गेल्या दोन वर्षांत करोनाखाली दबून गेलेल्या आनंदाच्या सगळय़ा प्रेरणा या वर्षीच्या दिवाळीत पुन्हा एकदा उमलून येऊ लागलेल्या दिसत आहेत.. या आनंदाला महागाईची, जागतिक मंदीच्या सावटाची, कशाकशाचीही तमा यंदा तरी नाही! भूतकाळातील सारे क्लेश आणि वेदना दूर सारत पुन्हा नव्या उत्साहाने आणि आनंदाने यंदाच्या दिवाळीला आपण सामोरे जात आहोत. दिवाळीपूर्वीच्या खरेदीचा उत्साह हेच तर दाखवतो आहे. कोणतेही धार्मिक कर्मकांड नसलेला असा हा देशभरातील सण. गेल्या दोन वर्षांत ना खरेदी करावीशी वाटली, ना फराळ करावासा वाटला. शेजाऱ्यापाजाऱ्यांकडे आणि नातेवाईकांकडे जावे लागले, ते सांत्वनासाठी किंवा दु:ख वाटून घेण्यासाठी. करोनाच्या लाटेत बुडालेल्या, क्षतिग्रस्त झालेल्या अशा अनेकांसाठी यंदाची दिवाळी पुन्हा एकदा आनंदाकडे झेपावणारी ठरते आहे. देशातील सगळेच सण रस्त्यावर येऊन, गर्दी करत साजरे करण्याची नवी मानसिकता गेल्या काही दशकांत निर्माण होऊ लागली आहे. दिवाळीचा आनंद असा रस्त्यावर येऊन साजरा करायची गरजच नसते. तो प्रत्येकाच्या अंतर्मनाच्या गाभ्यात साठवून ठेवायचा असतो. आता हेही हळहळू बदलू लागले.. पहाटे उठून नववस्त्र परिधान करून लगबगीने सांस्कृतिक कार्यक्रमांना जाण्याची नवी लाट आता स्थिरस्थावर होऊ लागली आहे. सुख आणि समाधान यांमधला फरक जाणवणारा हा एकमेव सण. वर्षांत क्वचित मिळणारा फराळ, कपडय़ांची वार्षिक खरेदी, गोडधोड खाणे अशा अप्रूपाचा हा सण. आनंद साजरा करण्यासाठी गरीब -श्रीमंत अशी वर्गवारी न करणारा आणि सगळय़ांच्या नजरेत समाधानाचे थेंब साठवणारा, साध्या साध्या गोष्टीतही मनाला सुखावणारा हा सण म्हणूनच प्रत्येकाला हवाहवासा वाटणारा आणि वाट पाहायला लावणारा. शरीराला होणाऱ्या संवेदनांमुळे सुख मिळते आणि मनाला स्पर्श करणाऱ्या छोटय़ा छोटय़ा गोष्टीही समाधानाचे माप पदरात टाकतात. जरा नीट न्याहाळले, तर एरवी सतत दुर्मुखलेल्यांच्या डोळय़ांत हे पैशांपलीकडचे समाधान कसे तरळत असते, हे पाहण्यातही कमालीची उभारी देणारे असते. आता दिवाळीत मिळणाऱ्या



## आनंदी सकाळ

# रघुनायकेविण काज आणिक नाही।'

वारकरी संप्रदायात अठरापगड जातींत संत निर्माण झाले; तसेच समर्थ संप्रदायातही एकापेक्षा एक श्रेष्ठ असे महंत निर्माण झाले. महंतांनी धर्मकारणाबरोबरच समाजकारण व प्रसंगी राजकारणही केले. महंतांचा आध्यात्मिक अधिकारही संतपरंपरेला शोभणारा होता. पट्टाभिषिक्त रामरायाचे वैभवही समर्थांनी खूप वाढवले. 'रघुनायकेविण काज आणिक नाही।' हाच भाव त्यांच्या वृत्तीत वसत होता. त्यासाठी रामदासी हा बलाने व बुद्धीने सतेज असावा, असी समर्थांची धारणा होती. महंतांसी शत्रुत्व घेताना समोरच्याला दहावेळा विचार करावा लागेल, असे सामर्थ्य आणि जरब महंतांच्या ठिकाणी असे. कल्याणस्वामी, उद्धव गोसावी यांसारख्या रामदासींनी तर असामान्य कर्तृत्व जागवले. कल्याणस्वामींनी योगमार्ग, तत्त्वज्ञान; तसेच गुरुसेवा यांत अनन्यसाधारण अधिकार प्राप्त केला. उद्धव गोसावींनी सारंगपूर येथून सातशे दीक्षित रामदासी भक्तांची पलटण उभी करून, ती महाराष्ट्रात आणली. वेण्णास्वामी

# वन्यप्राण्यांच्या अधिवासाची काळजीही व्हावी



भूमिका



जंगलांचे क्षेत्र दिवसेंदिवस घटते आहे. वन्यप्राण्यांच्या अधिवासाची काळजीही वारंवार कानी येते. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात तीन नवी अभयारण्ये जाहीर करण्याच्या निर्णयाचे स्वागत व्हावे. निसर्गरक्षणाची कळकळ तळागाळात झिरपण्यासाठी हा विषय सोपा करून सांगायला हवा. प्रत्येक राज्यात ३३ टक्के वनक्षेत्र राखणे बंधनकारक आहे. राष्ट्रीय वनक्षेत्र नियमावलीत तसे नमूद आहे. महाराष्ट्रातील वनक्षेत्राचा टक्का वीसच्या आत आला आहे. राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत मान्यता मिळाल्याने, राष्ट्रीय वन्यजीव मंडळाकडे प्रस्ताव जाईल आणि अभयारण्यांवर तातडीने अंमल होईल. या कामापूर्वी स्थानिकांना विश्वासात घेऊन, त्यांच्या योग्य पुनर्वसनानंतरच पुढे पाऊल टाकण्याच्या सूचना आहेत. संरक्षित क्षेत्रातील नागरिकांची घडी नीट बसविणे, हा महत्त्वाचा मुद्दा आहे. देशात १९७३मध्ये सर्वप्रथम नऊ व्याघ्र प्रकल्प जाहीर झाले. त्यात मेळघाट होते. पन्नास वर्षे होत आली असतानाही, मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील आदिवासी गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सुटलेला नाही. तीन-चार वर्षांपूर्वी तेथे वन विभाग आणि ग्रामस्थांमध्ये मोठा संघर्ष झाला. अन्य ठिकाणचे चित्र फार वेगळे नाही. अभयारण्यांच्या घोषणांमागे निसर्गाची काळजी असली, तरी ग्रामस्थांच्या नैसर्गिक जगण्याचे विस्मरण होऊ न देण्याची खबरदारीही घ्यायला हवी. व्याघ्र प्रकल्पांमुळे परिसरातील ग्रामस्थांवर जंगल प्रवेशापासून इतरही बंधने येतात. त्यातून अनेकांवर गुन्हे दाखल होतात. संयम सुटलेले काही ग्रामस्थ अडवणुकीवर येतात. जंगलांना आगी लावण्यापासून वन्यजीवांच्या शिकारींपर्यंत त्यांची मजल जाते. व्याघ्र प्रकल्पांऐवजी संवर्धन राखीव क्षेत्र जाहीर करणे, हा त्यावरील उपाय असतो.

नव्या निर्णयानुसार १२ संवर्धन राखीव क्षेत्रांचीही घोषणा झाली आहे. राज्यात आतापर्यंत १५ संवर्धन राखीव क्षेत्र अधिसूचित करण्यात आली असून, त्यातील आठ क्षेत्रांना मागील दोन वर्षांत मंजुरी मिळाली आहे. अशा संवर्धन राखीव क्षेत्राच्या जंगलात प्रवेश करण्याची ग्रामस्थांना परवानगी असते.

# काठोडा गावातल्या ऊसतोड कामगार महिलांची स्वतंत्र ओळख!

**महिला ऊसतोड करणार, पण पगाराची उचल घेणार तिचा नवरा. आपला पगार किती हे तिला माहीतही नसायचं.**

"बाई सासरी नांदायला जाते तशी कारखान्यावरही. पण तिला घरात गृहीत धरलं जातं तसंच फडावरही. तिनं राबायचं दोन्हीकडं. पण तिची दखल कुणालाच नाही." ऊसतोड बायांची ही उद्विग्नता शासनाच्या आदेशानंतरही कुणी ऐकेना, तेव्हा बीड जिल्ह्यातील काठोडा गावातल्या महिलांनीच कंबर कसली. दोन वर्षं सातत्यानं पाठपुरावा करून अखेर त्यांनी आपल्या गावातल्या ऊसतोड महिलांची 'ऊसतोड कामगार' म्हणून स्वतंत्र नोंदणी घडवून आणली. या महिलांना स्वत:च्या नावाचं स्वतंत्र ओळखपत्रही मिळालं आहे. या नोंदणीमुळं विविध शासकीय योजना, आरोग्याच्या योजना, कल्याणकारी योजनांचा लाभ घेणं सोयीचं होणार आहे. महिला किसान अधिकार मंच (मकाम) या संस्थेने १५ ऑक्टोबर या राष्ट्रीय किसान दिनानिमित्त पुण्यात १३-१४ ऑक्टोबर रोजी दोनदिवसीय शेतकरी महिला परिषद भरवली होती. त्या वेळी काठोडा गावचं हे सकारात्मक उदाहरण ऊसतोड कामगार संघटनेच्या



द्वारका वाघमारे यांनी मांडलं. मुळातच एखाद्या महिलेच्या कामाची स्वतंत्र नोंद होण्यासाठी आजही संघर्ष करावा लागतो. त्यातही ज्या कामांतून आर्थिक उत्पन्न होतं तेवढ्याच कामांची दखल घेतली जाते. ती घरात राबते त्याला तर कुणीच विचारत नाही. ऊसतोड महिलांची अवस्थाही याहून वेगळी नाही. प्रत्यक्षात ती घरातही राबते आणि फडावरही. फडावर तर नवरा-बायको दोघांना मिळून एक 'कोयता' मानलं जातं. कष्टाचं काम उपसूनही तिची वेगळी काही नोंदच नाही. जणू ती त्या कोयत्याचा एक अद्याहृत भाग.

साधारण १९५० मध्ये सहकारी साखर कारखाने सुरू झाले. तेव्हापासूनच ऊसतोडीची गरज राहिली आहे. मात्र ऊसतोड महिला कामगारांच्या स्थलांतर, शिक्षण, स्वच्छता, सुरक्षा या प्रश्नांबरोबरच आरोग्याचा गंभीर प्रश्न आहे हेच मुळी २०१९ मध्ये समोर आलं. महिलांच्या गर्भाशयाच्या पिशव्यांची विनाकारण ऑपेरशन्स होतात ही बाब माध्यमांमधून पुढे आली तेव्हा कुठं राजकीय क्षेत्राचं त्याकडे लक्ष वेधलं गेलं. त्यानंतर शासनानं किती महिलांच्या गर्भपिशव्यांचे ऑपरेशन्स झाली याचं सर्वेक्षण सुरू केलं. पण आकडा वाढू लागला तेव्हा हे सर्वेक्षणच गुंडाळण्यात आलं. यातूनच महिलांची आणि त्यांच्या प्रश्नांची दखल कशी घेतली जाते हे उघड होतं. महाराष्ट्रात साधारण २०० साखर कारखाने आहेत आणि अंदाजे आठ लाख कामगार कारखान्यावर काम करतात. बहुतांश ऊसतोड कामगार हे मराठवाडा विभागातील आणि विशेषत: बीड जिल्ह्यातून स्थलांतरित होतात. त्यात महिला कामगारांची संख्याही लक्षणीय आहे. मात्र त्यांच्याकडे ना कारखाने कामगार म्हणून पाहतात, ना त्यांचं कुटुंब त्यांच्याकडे कामगार म्हणून पाहतं.

## ।। अभंगवाणी ।।



तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोधे तैसे चि खळ ॥१॥
कां रे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# "भारत-पाकिस्तान सारखाच आम्हीही सामना खेळलो"

## ठाण्यातील 'दिवाळी पहाट' कार्यक्रमात CM एकनाथ शिंदेंची शाब्दिक फटकेबाजी

। मुंबई । महाईन्यूज ।

यंदा शिंदे गटाकडून ठाण्यात 'दिवाळी पहाट' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हजेरी लावली. यावेळी बोलताना त्यांनी चांगलीच शाब्दिक फटकेबाजी केली. "भारत-पाकिस्तान सारखाच आम्हीही तीन-साडेतीन महिन्यांपूर्वी एक सामना खेळलो आणि जिंकलो", असे ते म्हणाले. तसेच



यावेळी त्यांनी दिवाळीनिमित्त राज्यातील जनतेला शुभेच्छाही दिल्या. "दिवाळीबरोबच काल भारताने पाकिस्तानविरुद्ध जो सामना जिंकला, त्याचा आनंदही आपण आज साजरा करतो आहे. तुम्ही टीव्हीवर बघितलं असेल तर, काल मेलबर्नच्या मैदानातही आपली 'बाळासाहेबांची शिवसेना’ झळकली होती. कालचा सामना जसा जिंकला, तसाच सामना आम्ही तीन-साडेतीन महिन्यांपूर्वी खेळलो आणि जिंकलोही. तो सामना महाराष्ट्राने, देशाने बघितला. लोकांच्या मनातलं राज्य आणण्याचा आम्ही छोटासा प्रयत्न केला आहे. त्यामुळे आम्ही सत्तेत येताच, आधी आपली परंपरा,

■ "भारत-पाकिस्तान सारखाच आम्हीही तीन-साडेतीन महिन्यांपूर्वी एक सामना खेळलो आणि जिंकलो", असे ते म्हणाले. तसेच यावेळी त्यांनी दिवाळीनिमित्त राज्यातील जनतेला शुभेच्छाही दिल्या. "दिवाळीबरोबच काल भारताने पाकिस्तानविरुद्ध जो सामना जिंकला, त्याचा आनंदही आपण आज साजरा करतो आहे.

संस्कृती, सण, उत्सव साजरे करण्याची परवानगी दिली", अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

"खरं सांगायचं तर विकासाबरोबर या गोष्टीही आवश्यक आहेत. माणसाचे मन प्रसन्न असेल, तर त्याला पुढे जाता येतं. या राज्यात आता एक परिवर्तनाचे पर्व सुरू झाले आहे. आज मी ज्या ठिकाणी जातो, तिथे उत्फूर्त प्रतिसाद आम्हाला मिळतो. या गोष्टींचे समाधान आणि आनंदही वाटतो. त्याचे परिणाम ग्रामपंचायत निवडणुकीतही दिसून आले", असेही ते म्हणाले.

# ऐन दिवाळीत उसदरासाठी केले खर्डा-भाकरी आंदोलन

## बळीराजा संघटना आक्रमक

। कराड । महाईन्यूज ।

जागतिक व स्थानिक बाजारपेठांमध्ये साखरेला चांगला दर मिळत असताना याउलट उसाला कमीचा दर देऊन शेतकऱ्यावर घोर अन्याय होत असल्याची टीका करत याच्या निषेधार्थ बळीराजा शेतकरी संघटनेने आज सोमवारी लक्ष्मिपुजना दिवशी कराड तहसील कचेरीच्या दारात खर्डा-भाकरी खावून आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या.

या लक्षवेधी आंदोलनात बळीराजा शेतकरी संघटनेचे अध्यक्ष पंजाबराव पाटील, प्रदेशाध्यक्ष बी.जी. पाटील, जिल्हाध्यक्ष विश्वास जाधव आदी पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्त्यांसह शेतकरी सहभागी झाले होते. आंदोलनकर्त्यांसमोर बोलताना पंजाबराव म्हणाले, की साखर कारखानदारांनी गेल्यावर्षी अतिशय कमी उसदर दिला. एफआरपीमध्येही अन्याय करण्यात आला आहे. काटामारीही केली जात आहे. गेल्या चार वर्षात वर्षाला दोनशे रुपयांनी साखरदर वाढत गेला असताना उसाला मात्र, दरवर्षी शंभर रुपये कमी दर मिळत गेला आहे. तरी, शेतकऱ्यांनी कणखर भूमिका घेतल्यास उसाला निश्चित चांगला दर मिळेल. त्यासाठी साखर कारखानदार उसाला योग्य भाव जाहीर करीत नाहीत, एकरकमी एफआरपी देत नाहीत, आणि उसाला एफआरपी अधिक एक हजार रुपये दर मिळत नाही तोपर्यंत उसाला कोयता लावून देवू नका असे आवाहन पंजाबरावांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना केले. आमच्या न्याय्य मागण्यांसाठी तसेच यावर्षी कारखानदारांनी उसाचा दर जाहीर केला नसल्याने त्याच्या निषेधार्थ ऐन दिवाळीत आम्हाला खर्डा-भाकरी खाऊन सरकारचा आणि कारखानदारांचा जाहीर निषेध करावा लागल्याबाबत पंजाबराव पाटलांनी संताप व्यक्त केला.



# ...ती बँकच अस्तित्वात नाही, शरद पवारांचा शिंदे-फडणवीस सरकारबाबत मोठा खुलासा

## "हे तर लबाडाच्या घरचं आवतण"

। मुंबई । महाईन्यूज ।

भू-विकास बँकेचे कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना ९६४ कोटी रुपयांची कर्जमाफी देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. तसेच, भू-विकास बँकेकडून सरकारला येणे असलेल्या रकमेमध्ये समायोजित करण्यास सरकारने मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता दिली होती. त्यावरून आता भू-विकास बँकेच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवारांनी शिंदे-भाजपा सरकारची पोलखोल केली आहे.

शरद पवारांनी पुरंदर येथे शेतकऱ्यांनी संवाद साधला.




त्यावेळी बोलताना त्यांनी म्हटलं की, "राज्य सरकारने भू-विकास बँकेचे कर्ज माफ केल्याचं जाहीर केलं. गेल्या दहा वर्षात भू-विकास बँकेचे कर्ज एकाला तरी मिळालं का? भूविकास बँक अस्तित्वात आहे का? भूविकास बँक होती का? याची माहिती नाही. २५ ते ३० वर्षे झाली बँकेची कोणी कर्ज वसुली केली नाही. राहिलेली वसुली होणार नाही हे कळल्यावर, कर्ज माफी देण्यात आली. 'लबाडाच्या घरचं आवताण जरी असलं तरी जेवल्याशिवाय खरं नसतं' असं भाजपावल्याचं काम आहे," अशी अशी टीका शरद पवारांनी केली आहे. तसेच, राज्यात अतिवृष्टीने मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचं नुकसान झालं आहे. त्यावर बोलताना "अतिवृष्टीने शेतकऱ्यांच नुकसान झालं आहे. त्या नुकसानीची भरपाई केंद्र आणि राज्य सरकारने करावी म्हणून आम्ही सगळे मिळून प्रयत्न करू. यासाठी संघर्ष करावा लगाला तर चालेल," असेही शरद पवारांनी सांगितलं.

# आरे कॉलनीत बिबट्याच्या हल्ल्यात दीड वर्षीय चिमुरडीने गमावला जीव

। मुंबई । महाईन्यूज ।

गोरेगावमधील आरे कॉलनी परिसरात सोमवारी सकाळी बिबट्याच्या हल्ल्यात एका दीड वर्षाच्या चिमुकलीचा मृत्यू झाला. इतिका अखिलेश लोट, असे या मुलीचे नाव आहे. या हल्यानंतर परिसरातील स्थानिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झालं आहे. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी आणि



पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

आरे कॉलनीमधील वस्त्या, पाड्यांवर बिबट्याचा मोठ्या प्रमाणावर वावर असतो. अधूनमधून बिबट्याच्या हल्ल्याच्या घटनाही घडत असतात. सोमवारी ( २४ ऑक्टोंबर ) सकाळी ६.३० च्या सुमारास आरे दुग्ध वसाहतीतील युनिट क्रमांक १५ मध्ये वास्तव्यास असलेले अखिलेश लोट यांची दीड वर्षाची मुलगी इतिका गायब झाली. त्यामुळे लोट कुटुंबिय आणि त्यांच्या शेजारच्या रहिवाशांनी घराच्या आसपास आणि जंगलात इतिकाचा शोध घेण्यास सुरुवात केली.

काही वेळाने घरापासून काही अंतरावर इतिका जखमी अवस्थेत सापडली. तिला तात्काळ सेवन हिल्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याने डॉक्टरांनी घोषित केलं. ऐन दिवाळीत अशी दुर्घटना घडल्याने आरे परिसरात शोककळा पसरली आहे. दुसरीकडे आरे कॉलनीत बिबट्याचे हल्ला वाढल्याने परिसरातील स्थानिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झालं आहे.

# भारतीय वंशाचे सुनक ब्रिटनचे नवे पंतप्रधान!

## ब्रिटनच्या गडगडलेल्या अर्थव्यवस्थेला 'ऋषी' देणार नवसंजीवनी?

**। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

भारतीय वंशाचे ब्रिटनचे नेते ऋषी सुनक यांची ब्रिटनच्या पंतप्रधानपदी निवड करण्यात आली आहे. ब्रिटनचे माजी पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांनी माघार घेतल्यामुळे सुनक यांचा विजय जवळजवळ निश्चित मानला जात होता. जॉन्सन यांनी माघार घेतल्यानंतर पेनी मॉर्डन्ट यांच्याकडे सुनक यांचे प्रतिस्पर्धी म्हणून



पाहिले जात होते. मात्र सत्ताधारी हुजूर पक्षाच्या खासदारांनी सुनक यांना पाठिंबा दिल्यामुळे शेवटी ब्रिटनचे पंतप्रधान म्हणून त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. सुनक हे मागील सात महिन्यांतील ब्रिटनचे तिसरे पंतप्रधान असतील.

सत्ताधारी हुजूर पक्षाच्या '१९९२ समिती'ने सुनक यांना पक्षाचा नेता म्हणून घोषित केले आहे. म्हणजेच सुनक आता ब्रिटनच्या पंतप्रधानपदी विराजमान होतील. हंगामी पंतप्रधान लिझ ट्रस यांच्याकडून ते पंतप्रधापदाचा पदाभार स्वीकारतील.

### शर्यत जिंकलीच!

**ऋषी सुनक दुसऱ्यांदा पंतप्रधानपदाच्या शर्यतीत होते. याआधी जुलै महिन्यात ते लिझ ट्रस यांचे प्रतिस्पर्धी म्हणून पंतप्रधानपदाच्या शर्यतीत उतरले होते. मात्र तेव्हा त्यांना पंतप्रधानपदाने हुलकावणी दिली होती. त्या निवडणुकीत लिझ ट्रस विजयी झाल्या होत्या. मात्र पक्षाचा पाठिंबा गमावल्यामुळे तसेच दिलेली आश्वासने पूर्ण करू न शकल्यामुळे ट्रस यांना अवघ्या ४५ दिवसांत राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर आता ऋषी सुनक हे दुसऱ्यांदा पंतप्रधानपदाच्या शर्यतीत उतरले होते. यावेळी मात्र हुजूर पक्षातील खासदारांनी त्यांना पाठिंबा दिल्यामुळे त्यांनी पंतप्रधानपदाची शर्यत जिंकली आहे.**

### अर्थव्यवस्था रुळावर आणण्याचे आव्हान

**मागील काही दिवसांपासून ब्रिटनची बिकट परिस्थिती झाली आहे. येथील अर्थव्यवस्था गटांगळ्या खात असून दैनंदिन वापरातील वस्तू महागल्या आहेत. वाढत्या महागाईमुळे येथे अस्थिरता निर्माण झालेली आहे. याच कारणामुळे मागील सात महिन्यांमध्ये येथे दोन पंतप्रधानांनी राजीनामा दिलेला आहे. सात महिन्यांतील सुनक हे तिसरे पंतप्रधान आहेत. त्यांच्यापुढे ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेला पुन्हा रुळावर आणण्याचे आव्हान असेल. त्यासाठी त्यांना काही ठोस आणि सकारात्मक परिणाम देणारे निर्णय घ्यावे लागणार आहेत.**

## 'फिलिप्स'कडून जगभरातील चार हजार कर्मचारी कपात करण्याचा निर्णय

**। अमरावती । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

तंत्रज्ञान कंपनी फिलिप्सने एक निवदेन जारी करत लवकरच चार हजार कर्मचाऱ्यांना नोकरीवरून काढणार असल्याची घोषणा केली आहे. मागील काही महिन्यांपासून कंपनीला मोठ्या आव्हानांचा सामना करावा लागत असल्याने उत्पादन घटले आहे. तसेच कंपनीच्या उत्पन्नावरही मोठा प्रभाव पडला आहे. त्यामुळे हा कठीण निर्णय घेत असल्याचे कंपनीकडून सांगण्यात आले आहे. फिलिप्सचे सीईओ रॉय जेकब्स यांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, "कंपनीची उत्पन्न वाढवण्यासाठी आम्हाला काही कठोर निर्णय घ्यावे लागत आहेत. इच्छा नसतानाही आम्ही जगभरातील चार हजार कर्मचारी

### कंपनीला मोठ्या आव्हानांचा सामना




कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय आमच्यासाठी कठीण आहे. मात्र, काही कारणास्तव आम्हाला हा निर्णय घ्यावा लागतो आहे. गेल्या काही महिन्यांपासून कंपनीला महागाई, करोना आणि रशिया-युक्रेन युद्ध यामुळे अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो आहे. याचा परिणाम कंपनीच्या उत्पन्नावर पडला आहे. त्यामुळे नफा वाढवण्यासाठी आता आम्हाला आमच्या खर्चात कपात करावी लागणार आहे."

## भारतीय जवान हेच माझं कुटुंब, यापेक्षा गोड दिवाळी असू शकत नाही:पंतप्रधान नरेंद्र मोदी!

**। इटावा । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे दरवर्षी भारतीय सैनिकांबरोबर दिवाळी साजरी करतात. यंदाची दिवाळी त्यांनी जम्मू-काश्मीरमधील कारगिल द्रास येथे भारतीय सैनिकांबरोबर साजरी केली आहे. यावेळी त्यांनी सैनिकांशी संवाद साधला. तसेच यावेळी सैनिकांना संबोधित करताना भारतीय जनान हेच माझे कुटुंबीय आहेत. यापेक्षा गोड दिवाळी असू शकत नाही, असे नरेंद्र मोदी म्हणाले आहेत.

कारगिलची ही भूमी सामर्थ्याचे प्रतिक आहे. या भूमिला नमन करण्याची भावना



मला पुन्हा पुन्हा येथे घेऊन येते. माझ्यासाठी मागील कित्येक वर्षांपासून देशातील सैनिक हेच माझे कुटुंबीय आहेत. तुमच्यामध्ये आल्यानंतर माझी दिवाळी आणखी गोड होते. माझ्या दिवाळीचा उत्साह तुमच्याजवळ आहे. मला मागील कित्येक वर्षांपासून तुमच्यासोबत दिवाळी साजरी करता येते. हे माझे सौभाग्यच आहे, असे नरेंद्र मोदी सैनिकांना उद्देशून म्हणाले. तुमच्या (सैनिक) शौर्यासमोर आकाशदेखील झुकतो. कारगिलचे क्षेत्र भारतीय सेनेच्या शौर्याचे प्रतिक आहे. शिखरावर बसलेला शत्रूदेखील भारतीय सेनेच्या साहसासमोर छोटा होतो. तुम्ही (सैनिक) सीमेचे रक्षक असून देशाचे महत्त्वाचे स्तंभ आहात. तुम्ही देशाच्या सीमेवर आहात म्हणून देशातील लोक सुखात आहेत. देशाच्या सुरक्षेला संपूर्णता देण्यासाठी आपला प्रत्येक नागरिक प्रयत्न करत आहे. देशाची सीमा सुरक्षित असते, अर्थव्यवस्था सुदृढ असते आणि समाज आत्मविश्वासने ओतप्रोत असते तेव्हाच देश सुरक्षित असतो. देशाच्या ताकदीबद्दल ऐकल्यानंतर सैनिकांचेही मनोबल वाढत असेल, असे नरेंद्र मोदी म्हणाले.

## 'इस्रो'ची व्यावसायिक यशाची दिवाळी !

### 'एलव्हीएम3-एम2'द्वारे ब्रिटिश कंपनीचे 36 दूरसंचार उपग्रह प्रक्षेपित

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

भारतीय अवकाश संशोधन संस्थेतर्फे (इस्रो) सर्वात वजनदार उपग्रह प्रक्षेपक 'एलव्हीएम ३-एम२'चे रविवारी यशस्वी प्रक्षेपण करण्यात आले. ब्रिटिश कंपनीचे ३६ ब्रॉडबँड दूरसंचार उपग्रह यशस्वीरीत्या पूर्वनिश्चित कक्षांमध्ये पोहोचवण्यात आले. 'इस्रो'ने आपल्या पहिल्याच व्यावसायिक मोहिमेत हे यश मिळवून ऐतिहासिक कामगिरी केली आहे. ब्रिटनची कंपनी वनवेब लिमिटेडने या मोहिमेसेठी 'इस्रो'ची व्यावसायिक शाखा न्यू स्पेस इंडिया लिमिटेडशी (एनएसआयएल) करार केला होता. वन वेब लिमिटेड ही अंतराळ क्षेत्रात कार्यरत असलेले जगभरात दूरसंचार



जाळे असलेली कंपनी आहे. ती सरकारी सेवा आणि उद्योगांना इंटरनेट सेवा प्रदान करते. भारती एंटरप्रायझेस ही 'वन वेब'मधील प्रमुख गुंतवणूकदार आहे. 'इस्रो' व त्याची व्यावसायिक शाखा 'एनएसआयएल'सोबत भागीदारी असल्याने २०२३ पर्यंत भारतात दूरसंचार सेवा प्रदान करणार आहोत असे 'वन वेब'ने सांगितले. मात्र, या नव्या मोहिमेतील यशानंतर रविवारी पहाटे 'इस्रो'चे अध्यक्ष एस. सोमनाथ यांनी जाहीर केले, की 'इस्रो'मधील शास्त्रज्ञांसाठी दिवाळी लवकर सुरू झाली आहे. 'इस्रो'ने 'ट्वीट' केले, की 'एलव्हीएम २ एम२/वन वेब इंडिया-१' मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण झाली. सर्व ३६ उपग्रह नियोजित कक्षेत पोहोचवले आहेत. श्रीहरिकोटा प्रक्षेपण केंद्रातून रात्री १२ वाजून ७ मिनिटांनी प्रक्षेपण झाल्यानंतर सुमारे ७५ मिनिटांनी सर्व ३६ उपग्रह त्यांच्या नियोजित कक्षेत सोडण्यात आले. 'एलव्हीएम' हा उपग्रह प्रक्षेपक आठ हजार किलोपर्यंतचे उपग्रह वाहून नेण्याची क्षमता असलेला 'इस्रो'चा सर्वात वजनदार प्रक्षेपक आहे.

सोमनाथ म्हणाले, की या यशामुळे सतीश धवन अवकाश केंद्रात दिवाळी

# आलिया – रणबीरची लग्नानंतरची पहिली दिवाळी



फेस्टिवल सिझन मध्ये प्रत्येकाचेच काही न काही प्लॅन्स असतात आणि त्यातही बॉलिवूड सेलिब्रिटींचे धमाकेदार सेलिब्रेशन असते. अशातच मागील काही दिवसांपासून बॉलिवूडमध्ये दिवाळी पार्टीचं आयोजन केलं जात आहे. क्रिती सेनन, एकता कपूरपासून ते अगदी मनीष मल्होत्रा यांच्या घरी दिवाळी पार्टीचं आयोजन केलं होतं. दिवाळी निमित्त अनेक सेलिब्रिटी एकमेकांच्या घरी दिवाळी पार्टी निमित्त हजेरी लावत आहेत. पण कपूर घरात मात्र डिवचले पार्टीचं आयोजन केले गेले नाही. अशातच रणबीर कपूर याने आई बनणाऱ्या आलीय सोबत कशी दिवाळी साजरी करणार याबाबत खुलासा केला आहे.

आलीया आणि रणबीर ही बॉलिवूड मधील एक लोकप्रिय जोडी आहे. या दोघांचाही मोठा चाहता वर्ग आहे. या दोघांसंदर्भात प्रत्येक माहिती जाणून घेण्यासाठी त्यांचे चाहते उत्सुक असतात. आलीया आता लवकरच आई होणार आहे त्यामुळे रणबीर सुद्धा तिची खूप काळजी घेत आहे. दिवाळी पार्टीबद्दल रणबीरने नुकताच खुलासा केला आहे. या बद्दल बोलताना रणबीर म्हणाला, "आमच्या कुटुंबातील सर्वांना आता अशा प्रकारच्या पार्टीचा भाग व्हायचं नाही. म्हणून आम्ही शांततेत दिवाळीचा उत्सव साजरा करत आहोत. आम्ही आमच्या मित्रांना आणि कुटुंबियांना दिवाळीच्या निमित्ताने भेटत आहोत पण आम्ही कोणत्याही पार्टीचा भाग होत नाही.

# दिवाळी पार्टीत गोल्डन लेहेंग्यात गोडच दिसली न्यासा देवगण


अजय देवगण आणि काजोलची मुलगी न्यासा देवगण नुकत्याच पार पडलेल्या दिवाळी पार्टीत नजरेस पडली, पण त्यात तिला ओळखताच येईना असं अनेकांचे मत पडले. न्यासा देवगणला भूमी पेडणेकरच्या दिवाळी पार्टीत स्पॉट केलं गेलं,ज्याचे फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. सध्या तर न्यासा तिच्या ग्लॅमरस अंदाजामुळे भलतीच चर्चेत आहे. पण या दिवाळी पार्टीतील फोटो पाहून नेटिझन्स न्यासाला जोरदार ट्रोल करताना दिसत आहेत. सर्वचजणं अंदाज लावत आहेत की तिनं चेहऱ्याची सर्जरी केली असावी. चला,सविस्तर जाणून घेऊया याविषयी. बॉलीवूडमध्ये सध्या मोठ्या धामधुमीत दिवाळी साजरी करताना सगळेच स्टार दिसत आहेत. स्टार्स सोबतच निर्माते देखील दिवाळी पार्टीचं आयोजन करताना दिसत आहेत. काही दिवसापूर्वीच मनीष मल्होत्राच्या घरी दिवाळी पार्टीचं आयोजन केलं गेलं होतं,तेव्हा अनेक स्टार्सनी हजेरी लावली होती. त्यानंतर २१ ऑक्टोबर,२०२२ रोजी बॉलीवूड अभिनेत्री भूमी पेडणेकरने दिवाळी पार्टीचं आयोजन केलं होतं, ज्यामध्ये बॉलीवूडचे अनेक स्टार्स पोहोचले होते, ज्यात अजय देवगणची मुलगी न्यासा देवगण देखील सामिल झाली होती. भूमी पेडणेकरच्या दिवाळी पार्टीत न्यासाला गोल्डन कलरच्या लेहेंग्यात स्पॉट केलं गेलं होतं,ज्यात ती खूपच सुंदर दिसत होती. या दिवाळी पार्टीतले न्यासाचे फोटो आणि व्हिडीओ समोर आले आहेत,ज्यात न्यासा कारमध्ये बसली होती आणि आपल्या फ्रेंड्स सर्कलसोबत मजा-मस्ती करताना दिसत आहे. बातमीत तो व्हिडीओ जोडलेला आहे.

न्यासाचा भूमीच्या पार्टीतला व्हिडीओ व्हायरल झाला तसं नेटकऱ्यांनी तिल ट्रोल करायला सुरुवात केली आहे. एका नेटकऱ्यानं लिहिलं आहे की,'ही न्यासा का? ओळखताच येत नाही हीला?' तर कुणी कमेंट केलीय की,' बोटोक्स का कमाल...', तर कुणी लिहिलंय,'सर्जरीसाठी धन्यवाद'. आणखी एकानं लिहिलं आहे की,'वर्षभरापूर्वी पर्यंत ही कशी दिसायची,हे सगळं सर्जरी,बोटोक्स आणि व्हाइटनिंग इंजेक्शनची कमाल आहे'.

काहीही असलं तरी, अजय आणि काजोलच्या कन्येनं भूमीच्या पार्टीत सगळ्यांच्याच नजरा आपल्याकडे वेधून घेतल्या. पण न्यासानं खरंच अशी कोणती सर्जरी केलीय का किंवा ट्रीटमेंट केलीय का? याविषयी काही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.



# मनी लॉंड्रिंग प्रकरणातून अभिनेत्री जॅकलीनला दिलासा



सुकेश चंद्रशेखर याच्याशी संबंधित 200 कोटींच्या मनी लॉंड्रिंग प्रकरणात दिल्लीच्या पटियाला हाऊस कोर्टाने अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिसला दिलासा दिला आहे. न्यायालयाने जॅकलिनची अंतरिम जामीन 10 नोव्हेंबरपर्यंत वाढवला आहे. शनिवारी दुपारी 2 वाजता जॅकलिन तिच्या वकिलांसह न्यायालयात पोहोचली. गेल्या सुनावणीतही न्यायालयाने तिचा अंतरिम जामीन मंजूर केला होता.

सुकेश चंद्रशेखरचा समावेश असलेल्या 200 कोटी रुपयांच्या मनी लॉंड्रिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालय (ED) प्रकरणी बॉलीवूड अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिसच्या नियमित जामीन अर्जावर आज सुनावणी झाली. पतियाळा हाऊस कोर्टाने 26 सप्टेंबर रोजी अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिसला 200 कोटी रुपयांच्या मनी लॉंड्रिंग प्रकरणात 50,000 रुपयांच्या जामीनावर अंतरिम जामीन मंजूर केला होता. सुकेशने जॅकलीनला महागड्या कार आणि महागड्या गिफ्ट्स दिले होते. अभिनेत्रीच्या कुटुंबीयांनाही त्यांने कार भेट दिली. पिंकीने सुकेशची जॅकलिनशी ओळख करून दिली होती. त्या दोघांच्या जाळ्यात ती पूर्णपणे फसली होती आणि तिने लग्न करण्याचेही ठरवले होते.

मुंबईत राहणारी पिंकी इराणी हिला सुकेशने आपला एजंट म्हणून बोलवायचा आणि तिच्यामार्फत तो मनमोहक मॉडेलिंग करणाऱ्या मुलींनाही जेलमध्ये बोलावून खोलीत भेटायचा. भेटल्यानंतर तो सर्वांना महागड्या भेटवस्तूही भेट देत होता.

# टी – 20मध्ये भारताच्या विजयानंतर शाहरुख खानने केले विराटचे कौतुक



रविवार 23 ऑक्टोबर रोजी टी- 20 विश्वचषकातील लक्षवेधी असा भारत विरुद्ध पाकिस्तान असा सामना रंगला. पाकिस्तानविरुद्ध भारताने दमदार कामगिरी केली आणि भारताचा विजय झाला. त्यामुळे सर्वच देशवासीयांच्या दिवाळीचा आनंद सुद्धा द्विगुणित झाला. भारताच्या विजयचा उत्सव देशभर साजरा केला गेला. दरम्यान बॉलीवूडच्या अनेक सेलिब्रिटींनी विराट कोहलीला त्याच्या या दमदार कामगिरीबद्दल शुभेच्छा दिल्या आहेत. आता या यादीत बॉलिवूडचा किंग खान म्हणजेच अभिनेता शाह रुख खान यांच्या नावाचा देखील समावेश झाला आहे. शाह रुख खान याने विराट साठी एक खास पोस्ट लिहिली आहे. भारताने सामना जिंकताच सर्व देशवासियांप्रमाणेच बॉलिवूडमध्येही आनंदाची लाट उसळली. कार्तिक आर्यन, वरुण धवन, प्रीती झिंटा या कलाकारांनी सोशल मीडियावर भारताच्या विजयाचा आनंद व्यक्त केला. त्याचवेळी शाहरुखने टी-20 विश्वचषकात हा लक्षवेधी सामना जिंकल्याबद्दल भारतचे आणि विराट चे अभिनंदनही

## शॉर्ट न्यूज »

### भारताच्या विजयानंतर गौतम गंभीर ठरतोय टीकेचा धनी



। मुंबई । महाईन्यूज

ऑक्टोबर २३, २०२२ ही तारीख पुढील अनेक वर्ष क्रिकेट चाहत्यांच्या लक्षात असेल यात शंका नाही. भारतीय क्रिकेट संघाचे समर्थक आणि माजी कर्णधार विराट कोहलीचे कट्टर चाहते ही तारीख आणि या तारखेला विराटने मेलबर्नच्या मैदानात केलेली खेळी आवर्जून आठवतील यात शंका नाही. अगदी शेवटच्या चेंडूपर्यंत रोमहर्षक ठरलेला टी-२० विश्वचषक स्पर्धेतील भारत-पाकिस्तान सामना भारताने चार गडी राखून जिंकला अन् भारतात दिवाळीचा उत्साह द्विगुणित झाला. भारताची स्थिती ३१ धावांवर चार गडी बाद अन् विजयासाठी १६० धावांचं लक्ष्य अशी असताना विराटने सामना जिंकवून दिला अन् हा सामना आता कायमचा क्रिकेट चाहत्यांच्या स्मरणात राहणार आहे. पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ८ बाद १५९ अशी धावसंख्या केली.

# सुंदर पिचाईशी पंगा घेणे पाक चाहत्याला पडले भारी

## गुगलच्या सीईओने केली बोलती बंद

मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था



गुगलचे सीईओ सुंदर पिचाई यांनी सोमवारी ट्विटरवरून त्यांच्या चाहत्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. आपल्या ट्विटमध्ये त्यांनी भारत विरुद्ध पाकिस्तान सामन्याचाही उल्लेख केला आहे. एका पाकिस्तानी चाहत्याने सुंदर पिचाई यांना त्यांच्या पोस्टद्वारे ट्रोल करण्याचा प्रयत्न केला, परंतु गुगलचे सीईओने असे काही उत्तर दिले की, त्याची बोलतीच बंद झाली. सुंदर पिचाई यांच्या या उत्तराला चांगलीच पसंती मिळत आहे आणि ट्विटर युजर्सही त्यांच्या सेवेज रिप्लायचा स्क्रीनशॉट घेऊन ते व्हायरल करत आहेत.

दिवाळीच्या शुभेच्छा देताना सुंदर पिचाई यांनी ट्विट केले, "दिवाळीच्या शुभेच्छा! आशा आहे की उत्सव साजरा करणाऱ्या प्रत्येकजण आपल्या मित्रांसह आणि कुटुंबासह चांगला वेळ घालवत असेल. शेवटची तीन षटके पाहून मी आज पुन्हा आनंद साजरा केला, काय खेळ आणि कामगिरी." सुंदर पिचाई यांनी येथे शेवटच्या तीन षटकांमध्ये भारताच्या धावांचा पाठलाग करण्याचा संदर्भ दिला. कोहलीच्या पाकिस्तानविरुद्धच्या क्लासिक खेळीच्या जोरावर भारताने शेवटच्या चेंडूवर विजय मिळवला.

सुंदर पिचाई यांच्या या पोस्टवर पाकिस्तानच्या मुहम्मद शाहजेबने कमेंट करून ट्रोल करायचे होते. पाकिस्तानी चाहत्याने लिहले 'पहिली तीन षटके पाहिली पाहिजेत' असे लिहिले.

मुहम्मद शाहजेबच्या या कमेंटला उत्तर देताना सुंदर पिचाई यांनी लिहिले, 'ते पण केले, भुवी आणि अर्शदीपचा काय स्पेल होता.' पाकिस्तानी फॅन पाकिस्तानची पहिली तीन षटके पाहण्याबद्दल बोलत होता, जिथे भारतीय फलंदाज पाकिस्तानी वेगवान गोलंदाजांविरुद्ध झुंज देत होते. त्यादरम्यान कर्णधार रोहित शर्मा आणि उपकर्णधार केएल राहुल यांच्या विकेट्सही पडल्या होत्या. परंतु सुंदर पिचाईने चोख उत्तर दिले. भारतीय डावाची आठवण करून देताना अर्शदीप आणि भुवीच्या कामगिरीचा उल्लेख केला. ज्यामध्ये अर्शदीप आणि भुवीने चमकदार गोलंदाजी केली होती, त्या दरम्यान अर्शदीपने पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमला गोल्डन डकवर बाद केले होते.

# अटीतटीच्या सामन्यात बांगलादेशचा नेदरलँडवर ९ धावांनी विजय

## तस्किन अहमदची धारदार गोलंदाजी

।ओडेन्से।
महाईन्यूज । वृत्तसंस्था

आयसीसी टी-२० विश्वचषक २०२२ मधील सुपर-१२ टप्प्यातील सामना आज बांगलादेश विरुद्ध नेदरलँड संघात झाला. हा सामना होबार्ट येथे पार पडला. या सामन्यात बांगलादेशने तस्किन अहमदच्या शानदार गोलंदाजीच्या जोरावर, नेदरलँड ९ धावांनी विजय नोंदवला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशने १४५ धावांचे लक्ष्य नेदरलँड समोर ठेवले. परंतु नेदरलँडचा संघ १३५ धावांवरच आटोपला. बांगलादेशचा गोलंदाज तस्किन अहमद (4/25) याला त्याच्या चमकदार कामगिरीसाठी सामनावीर म्हणून गौरवण्यात आले.

नेदरलँडने नाणेफेक जिंकून बांगलादेशला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. नजमुल हुसेन शांतो आणि सौम्या सरकार यांनी संघाच्या डावाची सलामी दिली. त्याचबरोबर पहिल्या विकेटसाठी ४३ धावा जोडल्या. पॉल व्हॅन मीकरेनने १४ च्या वैयक्तिक धावेवर सरकारला बाद करत संघाला पहिले यश मिळवून दिली. दुसरा सलामीवीर शांतोने २५ धावांवर बाद झाला. लिटन दास आणि शकिब अल हसन यांनी निराशा केली आणि दोन्ही फलंदाज अनुक्रमे ९ आणि ७ धावांवर बाद झाले. त्यानंतर आणखी काही गडी बाद झाले. पण अफिफ हुसैन ३८ आणि मोसाद्देक हुसेन नाबाद २० धावांनी संघाला सन्मानजनक धावसंख्या गाठण्यात मदत केली.




महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही